महाराष्ट्र शासन

क्रमांक : संकीर्ण १५१७/प्र.क्र.४३/६-अे,
कृषि व पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व
मत्स्यव्यवसाय विभाग, मादाम कामा रोड,
हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई :३२
दिनांक : १५ सप्टेंबर, २०१७.

प्रति,

अध्यक्ष,
महाराष्ट्र कृषि विद्यापीठे सेवा प्रवेश मंडळ,
कृषि परिषद, १३२/ब, भांबुर्डा, भोसले नगर, पुणे.

विषय : कारकीर्द प्रगती योजना (CAS) अंतर्गत शिक्षक वर्गीय कर्मचाऱ्यांना टप्पा ४ मधिल रु.९,०००/- या ग्रेड वेतनावरुन टप्पा ५ च्या रु.१०,०००/- हे ग्रेड वेतन अनुज्ञेय ठरविण्याबाबत आणि पदनाम देण्याबाबत... .

संदर्भ : १) या विभागाचे समक्रमांकाचे दि.१०.४.२०१७ चे पत्र.
२) आपल्याकडील पत्र क्र.मकृप/मकृसेमं/आप्रयो-निवेदन/६४/२०१७, दि.१६.१.२०१७.

महोदय,

उपरोक्त विषयावरील या विभागाचे समक्रमांकाचे दि.१० एप्रिल, २०१७ चे पत्र रद्द करण्यात येत आहे आणि त्या अनुषंगाने आणखी कळविण्यात येते की, या विभागाचा इंग्रजी शासन निर्णय क्र.एयुजी-११०९/सीआर २५२/६-अे, दि.१८ मार्च, २०१० अन्वये दि.१.१.२००६ पासून ६ वा वेतन आयोग लागू करण्यात आला आहे आणि या विभागाचा इंग्रजी आदेश क्र.संकीर्ण २०१२/सीआर ११४/७-अे, दि.१५ मार्च, २०१४ अन्वये महाराष्ट्र कृषि विद्यापीठे परिनियम १९९० मध्ये दुरुस्त्या करण्यात आलेल्या आहेत. यामध्ये विहित केलेल्या तरतूदीनूसार, प्राध्यापक या पदासाठी इतर पात्रतेसह पीएचडी ही पात्रता अपेंडीक्स-१ यामध्ये विहीत करण्यात आलेली आहे आणि टप्पा क्र.५ चे रु.१०,०००/- हे ग्रेड वेतन अनुज्ञेय ठरविण्यात आलेले आहे. तसेच, या परिनियमातील दुरुस्तीनूसार, अपेन्डिक्स-२ खालील टेबल ७ मध्ये आणि दि.१८ मार्च, २०१० च्या शासन निर्णयामध्ये कारकीर्द प्रगती योजना (CAS) विहीत केलेली आहे. या कारकीर्द प्रगती योजनेंतर्गत वरीष्ठ ग्रेड वेतन मंजूर करतांना उक्त नमूद शासन निर्णय आणि परिनियमातील तरतूदींचा एकत्रित विचार करणे आवश्यक आहे. या शिवाय भारतीय कृषि अनुसंधान परिषद, नवी दिल्ली यांच्याकडील मार्गदर्शक तत्वांचाही विचार करणे आवश्यक आहे.

२. एकंदरीत संदर्भाधीन दि.१६.१.२०१७ च्या पत्राच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, वर नमूद केलेला शासन निर्णय दि.१८ मार्च, २०१०, दि.१५ मार्च, २०१४ च्या आदेशान्वये परिनियमामधील दुरुस्ती आणि भारतीय कृषि अनुसंधान परिषद यांच्याकडील मार्गदर्शक तत्वे यामध्ये विहित केलेल्या तरतूदींचा एकत्रित विचार करता, कारकीर्द प्रगती योजनेंतर्गत

(CAS) टप्पा क्र.४ मधील ग्रेड वेतन रु.९,०००/- मधील सहयोगी प्राध्यापकांना टप्पा क्र.५ मधील प्राध्यापक पदाचे ग्रेड वेतन रु. १०,०००/- मंजूर करण्यासाठी इतर विहीत पात्रतेसह पीएचडी ही पात्रता आवश्यक आहे.

३. तरी, या प्रकरणी उक्त नमूद शासन निर्णय दि.१८.३.२०१०, दि.१५.३.२०१४ च्या आदेशान्वये महाराष्ट्र कृषि विद्यापीठे परिनियम १९९० मध्ये करण्यात आलेली दुरुस्ती आणि भारतीय कृषि अनुसंधान परिषद यांनी वेळोवेळी निर्गमित केलेली मार्गदर्शक तत्वे या मधील विहित तरतूदीनूसार पुढील कार्यवाही करण्यात यावी, ही विनंती.

आपला,

(दे.आ.गावडे)
सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत माहीती व आवश्यक कार्यवाहीसाठी अग्रेषित:

१) महासंचालक, महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद, १३२-ब, भांबुर्डा, भोसलेनगर पुणे.
२) सर्व कुलगुरु/कुलसचिव, सर्व कृषि विद्यापीठे,
३) कार्यासन ६-अे/निवडनस्ती.

G:\letter.docx